**पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**
**प्रेसनोट**

CB/45/2026

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक २०.०७.२०२६**

## " वेश्या व्यवसायातुन ०९ पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका "

पोलीस आयुक्त, श्री. मिलिंद भारंबे, नवी मुंबई, पोलीस सह आयुक्त, श्री दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त ( गुन्हे ), श्री प्रमोद शेवाळे, पोलीस उप आयुक्त, ( गुन्हे ), श्री सचिन गुंजाळ, यांनी पोलीस आयुक्तालय परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदयावर कारवाई करण्याचे आदेशीत केले आहे.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गजानन कदम यांना दिनांक १८/०७/२०२६ रोजी माहिती मिळाली की, '' हॉटेल अॅबोर्ड ईन, लॉजिग अॅण्ड बोर्डीग, येथे मॅनेजर हा लॉज मध्ये महिला ठेवुन त्याच्याकडुन वेश्या व्यवसाय करून घेत असल्याची बातमी मिळाली '' वपोनि/गजानन कदम यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे सापळा रचुन बनावट ग्राहकास हॉटेल अॅबोर्ड ईन, लॉजिग अॅण्ड बोर्डीग येथे पाठवले असता, बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशा-यावरून पथकाने लॉजवर सांयकाळी पथकासह छापा टाकला असता, त्याठिकाणी ०९ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मॅनेजर बलराम नंजय गौडा, वेटर गिरीश शेखर पुजारी, वेटर कृष्णराज रितेशकुमार पाटील यांनी पिडीत महिलांना लॉज मध्ये ठेवुन मॅनेजर बलराम गौडा यांचे सांगण्यावरून वेटर कृष्णराज रितेशकुमार पाटील यांने त्यांना बनावट ग्राहकास दाखवुन बनावट ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबादला म्हणुन ३०००/- रूपये वेटर कृष्णराज रितेशकुमार पाटील यांने बनावट ग्राहक यांच्याकडुन स्वीकारली व नमुद लॉज वेश्याव्यवसायाकरीता वापरला म्हणुन आरोपी नामे १)बलराम नंजय गौडा ( मॅनेजर ), २)गिरीश शेखर पुजारी (वेटर), ३)कृष्णराज रितेशकुमार पाटील ( वेटर ) यांच्या विरूध्द तळोजा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर २९१/२०२६ भारतीय न्याय संहिता, २०२३, कलम १४३ (३), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम १९५६ कलम ३, ४, ५ अन्वये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास तळोजा पोलीस ठाणे करत आहे.

सदर गुन्हयातील वरील आरोपी यांना दिनांक १९/०७/२०२६ रोजी ०७:०९ वाजता कारवाई दरम्यान अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने त्यांना दिनांक २१/०७/२०२६ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहा. पोलीस आयुक्त, शैलेशकुमार अंचलवार सो, (AHTU) गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/गजानन कदम, सपोनि/योगेश देशमुख, पोउपनिरी/सरिता गुडे, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोहवा/२५०४ सविता म्हात्रे, पोहवा/२५०४ ज्योती अडकमोल, चालक पोहवा/४८०६ मोहिते यांनी केली आहे.


सहाय्यक पोलीस आयुक्त
व
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष
गुन्हे शाखा, नवी मुंबई